**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१६२/२०२३ मध्ये निशाणी क्र.१३१ वर आदेश</u>**

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी महत्वाचे कागदपत्र दाखल करण्यास परवानगी मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ व २ असे कथन करतात की, त्यांना काही महत्वाचे कागदपत्रे दाखल करणे आवश्यक आहेत. त्यामुळे सदर कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

३. सदर अर्जावर वादीने आपले म्हणणे दाखल केलेले नाही. प्रतिवादी क्र.३ तर्फे सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून हरकत घेतलेली आहे. प्रतिवादी क्र.३ चे म्हणणे आहे की, प्रतिवादींनी सदरचा अर्ज हा मे.न्यायालयाचा वेळ वाया घालविण्यासाठी व दावा लांबविण्याकामी तसेच प्रतिवादी क्र.३ ला नाहक त्रास देणे कामी करत आहेत. त्यामुळे सदर अर्जास तीव्र हरकत आहे. सबब, अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचे तोंडी म्हणणे ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, सदरचे कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी दिल्यास दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळेस मदत होणार आहे. तसेच सदरचे दस्त दाखल करून घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल.

**<u>आदेश</u>**

अर्ज निशाणी क्र.१३१ मंजुर करण्यात येतो.

SACHIN HINDURAO KHADE
Digitally signed by SACHIN HINDURAO KHADE
Date: 2025.12.10 11:23:51 +0530

सिन्नर.
दि.०९/१२/२०२५

(सचिन एच.खाडे)
दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,सिन्नर